**मेसर्स कुकडी सहकारी साखर कारखाना लिमिटेड, मुक्काम पोस्ट-पिंपळगाव पिसा, तालुका – श्रीगोंदा, जिल्हा. अहमदनगर या कंपनीच्या प्रस्तावित ऊस गाळप क्षमता विस्तार ३,५०० टन प्रतिदिन पासून ५,५०० टन प्रतिदिन पर्यंत व सहविद्युत निर्मिती क्षमता विस्तार १२ मेगावॅटपासून २७ मेगावॅटपर्यंत प्रकल्प संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतचा इतिवृतांत.**

---

मेसर्स कुकडी सहकारी साखर कारखाना लिमिटेड, मुक्काम पोस्ट-पिंपळगाव पिसा, तालुका - श्रीगोंदा, जिल्हा.अहमदनगर या कंपनीच्या प्रस्तावित ऊस गाळप क्षमता विस्तार ३,५०० टन प्रतिदिन पासून ५,५०० टन प्रतिदिन पर्यंत व सहविद्युत निर्मिती क्षमता विस्तार १२ मेगावॅटपासून २७ मेगावॅटपर्यंत प्रकल्प संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी दिनांक २१ एप्रिल, २०१७ रोजी सकाळी ११.०० वाजता प्रकल्प स्थळावर आयोजित करण्यात आलेली होती.

सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई-३०/२०१७,व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी /पीएच/बी-१५१३, दि.१३/४/२०१७ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती गठन करण्यात आली:-

१) श्री राजेन्द्रकुमार पाटील, - **अध्यक्ष**
अप्पर जिल्हादंडाधिकारी, अहमदनगर
(मा. जिल्हादंडाधिकारी, अहमदनगर यांचे प्रतिनिधी)

२) श्री प्रमोद रा.माने, - **समन्वयक**
उप प्रादेशिक अधिकारी, अहमदनगर
(मप्रनि मंडळ, यांचे प्रतिनिधी)

कारखाना व कारखाना परिसरातील आजूबाजूच्या गावातील 137 नागरीक सदरील जाहीर जन सुनावणीस हजर होते.उपस्थितांची यादी या सोबत जोडपत्र-1 प्रमाणे जोडली आहे.

श्री.राजेन्द्रकुमार पाटील, अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन जाहिर लोकसुनावणीबाबत रुपरेखा विषद करताना सांगितले की प्रथम लोकसुनावणीचे समन्यवक हे लोकसुनावणीबाबत केंद्र शासनाच्या

अधिनियमांची माहिती देतील व नंतर प्रकल्प प्रवर्तकांचे तांत्रिक सल्लागार हे प्रकल्पातील प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा व पर्यावरण उपाययोजनांबाबत माहिती देतील. त्यानंतर उपस्थित असलेल्यांना सदरहू प्रकल्पाबाबत काही आक्षेप व सूचना असल्यास त्या नोंदविण्याची संधी देण्यात येईल.

श्री.माने,समन्वयक यांनी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समितीच्या अध्यक्षांचे, प्रकल्प प्रवर्तकांचे प्रतिनिधी व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत केले. समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

श्री.माने, समन्वयक यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यापुर्वी पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. श्री.माने यांनी असे सांगितले की उप प्रादेशिक कार्यालय, अहमदनगर यांना मेसर्स कुकडी सहकारी साखर कारखाना लिमिटेड, मुक्काम पोस्ट-पिंपळगाव पिसा, तालुका-श्रीगोंदा, जिल्हा अहमदनगर. या कंपनीच्या प्रस्तावित ऊस गाळप क्षमता विस्तार ३,५०० टन प्रतिदिन पासून ५,५०० टन प्रतिदिन पर्यंत व सहविद्युत निर्मिती क्षमता विस्तार १२ मेगावॅटपासून २७ मेगावॅटपर्यंत प्रकल्पा संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीघेण्यासाठी अर्ज प्राप्त झाला.

यापुढे श्री.माने, समन्वयक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे. केंद्र शासनाच्या वने व पर्यावरण विभागाने यांनी दि.५ व ६ ऑगस्ट, २०१६ रोजीच्या झालेल्या बैठकीमध्ये दिलेल्या प्राथमिक मान्यता (TOR) नुसार जाहिर जनसुनावणी घेत असल्याचे नमुद केले. त्यानुसार सदरील पर्यावरण अधिसुचनेनुसार एक महिना अगोदर

स्थानिक वृत्तपत्रात पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी सूचना देणे बंधनकारक आहे.

त्याअनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय, अहमदनगर यांनी स्थानिक वृत्तपत्र लोकमतमध्ये मराठीत व टाईम्स ऑफ इंडिया यात इंग्रजीत दिनांक १८ मार्च, २०१७ रोजी जाहिर सुनावणी सूचना दिलेली होती. त्यात सामान्य जनतेस उपरोक्त प्रकल्पाविषयी काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ते लेखी नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्याप्रमाणे नियोजित प्रकल्पाविषयीचा पर्यावरण मुल्यांकन आघाताची प्रत मा.जिल्हादंडाधिकारी कार्यालय, अहमदनगर, मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई, प्रादेशिक कार्यालय,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,नाशिक, उप प्रादेशिक कार्यालय,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,अहमदनगर, जिल्हा परिषद, अहमदनगर, जिल्हा उद्योग केंद्र, अहमदनगर, ग्रामपंचायत, पिंपळगाव पिसा,कोळगाव, विसापुर,घारगाव तसेच पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई येथे सामान्य जनतेसाठी उपलब्ध करण्यात आलेले होते. यापुढे श्री.माने, समन्वयक यांनी असे सांगितले की सदर प्रकल्पास एकही लेखी आक्षेप उप प्रादेशिक कार्यालय,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, अहमदनगर यास प्राप्त झालेला नाही. मात्र उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप,हरकती, सूचना असल्यास ती संधि देण्यात आली असून ते लेखी व तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात. श्री.माने समन्वयक यांनी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी सुरु करण्याची परवानगी मा.अध्यक्षांकडुन घेतली.

त्यास अनुसरून श्री.राजेंद्रकुमार पाटील, अध्यक्ष यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन प्रकल्प अधिका-यांना पर्यावरण विषयक उपाय योजनांची माहिती शासनाच्या व स्थानिक भाषा मराठीतून करण्याची सूचना केली व सर्व जनसमूहाला निर्भयतेने त्यांचे काही आक्षेप, हरकती, सूचनाअसल्यास ते नोंदविण्याचे आवाहन केले.

त्यास अनुसरून प्रकल्प मे.कुकडी सहकारी साखर कारखाना लिमीटेड यांचे पर्यावरण सल्लगार श्री.एकनाथ अल्हाट (मे.वसंतदादा शुगर इन्स्टीटयुट,पुणे) यांनी पॉव्हर पॉईंटच्या माध्यमातुन प्रस्तावित विस्तारीकरणाचे सविस्तर सादरीकरण केले. त्यांनी प्रकल्पाचे विविध पैलु जसे, त्यांचा हेतु, क्षमता, त्यापासुन तयार होणारी उत्पादने व उप

उत्पादने, एकुण गुंतवणुक, प्रदुषणाचे स्त्रोत व त्यांचे नियंत्रण, संभाव्य पर्यावरणीय परिणाम जसे की,पाणी, हवा,जमीनीवर होणारो परिणाम आणि त्या दृष्टीने मे.कुकडी सहकारी साखर काराखाना लि. यांनी प्रस्तावित केलेल्या उपाययोजना बाबतची माहिती सादरीकरणाव्दारे उपस्थित जनसमुहास दिली.

तदनंतर श्री राजेन्द्रकुमार पाटील, अध्यक्ष यांनी सर्व जनसमूहाला निर्भयतेने त्यांचे काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ते नोंदविण्याचे आवाहन केले.

१) **श्री दत्तु सीताराम इथापे, राहणार - खरातवाडी, पिंपळगाव पिसा, तालुका - श्रीगोंदा, जिल्हा — अहमदनगर. यांनी प्रश्न विचारला की, प्रकल्प विस्तारिकरणामुळे जल प्रदूषणात वाढ होऊ शकते का व त्याबाबत प्रकल्प प्रवर्तकांनी काही उपाययोजना केली आहे का ?**

त्यावर कंपनीच्या तांत्रिक सल्लागार यांनी सांगितले की उत्पादनात तयार होणा-या सांडपाण्यावर प्रक्रिया करुन प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा पुनर्वापर उत्पादन प्रक्रियेत व हरितपट्टा विकासासाठी करण्यात येणार आहे. त्यामुळे परिसरात कोणतेही जल प्रदूषण होणार नाही.

२) **श्री एकनाथ गंगाधर खामकर, राहणार - पिंपळगाव पिसा यांनी हवा प्रदूषण नियंत्रण सयंत्रणेविषयी माहिती विचारली.**

त्यावर कंपनी सल्लागार यांनी असे सांगितले की अत्यंत आधुनिक असणारी इलेक्ट्रो स्टॅटिक प्रेसिपरेटर (ESP) ही सयंत्रणा नविन बॉयलरसाठी कार्यान्वित करणार आहेत. त्यामुळे हवा प्रदूषणाचा कुठलाही त्रास परिसरातील रहिवाशांना होणार नाही.

३) **श्री विठ्ठल हरिभाऊ कर्डिले, राहणार - मुंगसेगाव यांनी उत्पादनात तयार होणा-या राखेच्या विल्हेवाटीबाबत माहिती विचारली.**

त्यावर प्रकल्प सल्लागार यांनी त्याबाबत माहिती दिली की सदरील राख कंपोस्टबरोबर मिसळुन ती शेतीसाठी वापरतात. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शक तत्वांनुसारच

सदरील राखेची विल्हेवाट लावण्याचे प्रयोजन असल्याचे सांगितले. त्यामुळे परिसरातील जनतेस उत्पादनातील राखेचा काहिही त्रास होणार नाही.

४) **श्री मधुकर विट्ठल जाधव, राहणार - पिंपळगाव पिसा यांनी अतिरिक्त उत्पादनामुळे परिसरात विविध प्रदूषणाची वाढ होण्याची भिती व्यक्त केली.**

त्यावर प्रकल्प प्रवर्तकांच्या तांत्रिक सल्लागार यांनी याबाबत स्पष्टीकरण दिले की अत्यंत आधुनिक दर्जाची प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा उत्पादन प्रक्रियेत कार्यान्वित करणार असल्याने परिसरातील नागरिकांना कुठलेही जल, हवा व ध्वनि प्रदूषणाचा त्रास होणार नाही. प्रकल्प प्रवर्तक प्रदूषण-मुक्त परिसरास बांधिल आहे व विविध पर्यावरण संवर्धन योजना अंमलबजावणीस बांधिल असल्याचीही ग्वाही दिली.

५) **श्री नानासाहेब सोनावणे, राहणार - एरंडोली गाव यांनी प्रश्न विचारला की स्थानिक जनता वीजेच्या त्रुटीमुळे त्रस्त आहे व प्रकल्पात तयार होणारी अतिरिक्त वीज स्थानिकांना उपलब्ध करण्यात येऊन त्यांची गरज भागविता येईल का** ?

त्यावर तांत्रिक सल्लागार यांनी स्पष्टीकरण दिले की प्रकल्पात विजेचे उत्पादन १२ मेगावॅटपासून २७ मेगावॅटपर्यंत वाढविण्यात येणार आहे. उत्पादन प्रक्रियेत अतिरिक्त वीज वापरल्यावर कारखाना कार्यान्वित असताना तयार होणारी १४.६५ मेगावॅट वीज व कारखाना कार्यान्वित नसताना तयार होणारी ९.८६ मेगावॅट वीज ही शासनाच्या नियमानुसार वीज मंडळास हस्तांतरित करण्यात येईल. साहजिकच विज मंडळास वीज उपलब्ध झाल्याने विजेची गरज भागविणे शक्य आहे.

श्री राजेन्द्रकुमार पाटील ,अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती व समन्यवय श्री माने यांनी उपस्थितांना काही आक्षेप, सूचना असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले. तदनंतर श्री राजेन्द्रकुमार पाटील, अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती यांनी बैठकीचा समारोप करताना मोठ्या संख्येत स्थानिकांनी उपस्थित राहून अतिशय अभ्यासू सूचना, हरकती उपस्थित केल्याबद्दल आभार

मानले. सदरहू सूचना, हरकती पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी इतिवृतान्तात नमुद करुनच सदरहू अहवाल योग्य त्या मार्गे संबधित विभागास पाठविण्यात येतो, त्याप्रमाणे तो सादर करण्यात येईल असे स्पष्टीकरण दिले.

श्री राजेन्द्रकुमार पाटील, अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती यांनी उपस्थित स्थानिक जनता, शासकीय अधिकारी, प्रकल्प अधिकारी यांचे आभार मानून बैठक संपन्न् झाल्याचे जाहिर केले.

**(प्रमोद एम. माने )**
समन्वयक तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ, अहमदनगर

**(राजेन्द्रकुमार पाटील)**
अध्यक्ष
पर्यावरण विषयक जाहीर
लोकसुनावणी समिती तथा
अप्पर जिल्हादंडाधिकारी, अहमदनगर,
जिल्हा- अहमदनगर